MHKO100003292022

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७५/२०२२**

मयोद्दीन आयुब मुल्ला
//वि.//
निखत मयोद्दीन मुल्ला

**निशाणी क्र. ३२ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी साक्षीदारास साक्षीसमन्स बजाविणेबाबत आदेश होणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा हा नांदण्यास येणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी पत्नी हिचे आरोग्याबाबत काळजी घेतलेबाबत कथन केले असुन तिचा उपचार देखील केलेला असल्याचे कथन केलेले आहे. याऊलट, प्रतिवादीने सदर बाब नाकारुन वादीविरुध्द कौटूंबिक हिंसाचार केलेबाबत कथन केले आहे. त्यानुसार, प्रस्तुत दाव्यात मुद्दे देखील काढण्यात आलेले आहेत. वादीने प्रतिवादीवर केलेल्या उपचारासंदर्भात कागदपत्रे दाखल केलेली आहेत. प्रस्तुत अर्जान्वये वादीने सदर प्रतिवादी हिचेवर झालेल्या उपचाराबाबतची कागदपत्रे शाबीत करणेकरीता संबंधीत साक्षीदारांना साक्षीसमन्स काढण्याची विनंती केली आहे. प्रतिवादीने आक्षेप घेतला आहे की, वादीने कोणतीही साक्षी यादी दिलेली नसुन सदर उपचाराबाबत वादीस माहिती असताना साक्षीदारांना स्वतःहून हजर ठेवणे आवश्यक असताना तसे न केल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादी यांची कथने पाहता आणि निश्चित केलेल्या वादमुद्यानुसार वादीची कथने शाबीत करण्याची जबाबदारी ही त्याचेवर आहे. त्याअनुषंगाने वादीने कथन केलेप्रमाणे सदर साक्षीदार तपासणेची वादीस संधी देणे आवश्यक आहे. सदर वादीने मागणी केलेप्रमाणे परवानगी न दिल्यास वादीचे नुकसान होणार आहे. तसेच, सदर साक्षीदार यांना तपासल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याशिवाय, प्रस्तुत न्यायालय हे दोन्ही बाजूंमधील वाद ठरविणारे प्रथम न्यायालय असल्यामुळे दोन्ही बाजूंना त्यांची कथने शाबीत करण्याकरीता पुरावा दाखल करण्याची संधी देणे आवश्यक असते. तसेच, सदर साक्षीदार तपासल्याने दाव्यातील वाद गुणदोषावर निकाली काढणेस न्यायालयास मदत होणार आहे. त्यामुळे, वादीने मागणी

केलेप्रमाणे साक्षीसमन्सचा आदेश करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज साक्षीभत्यासह मंजुर करण्यात येतो.

०२. वादीने भत्ता भरल्यानंतर संबंधीत साक्षीदार यांना समन्स काढण्यात यावे.

०३. वादीने साक्षीदार यांचा भत्ता हा पुढील तारखेपर्यंत भरावा अन्यथा प्रस्तुत अर्ज नामंजूर समजण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2025.01.15 17:34:37 +0530

**( एस. ए. राठोड )**

गडहिंग्लज. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

दिनांकः १५/०१/२०२५. गडहिंग्लज.

Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 15/01/2025 |
| Order signed by P.O. on | 15/01/2025 |
| Order uploaded on | 15/01/2025 |